## दिवाणी किर. अर्ज नं. ४०१/२०१२ मधील नि.१२३ खालील आदेश

**CNR : MHSN06001409-2012**

**(रामचंद्र कदम वि लहुदास कदम आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी जाहिर होऊन मिळणेकरीता, तथाकथित बोगस खरेदीदस्त रद्द होऊन वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत होऊन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादी क्र. १/1 गोपिचंद रामचंद्र कदम हे दि. ०६.०३.२०२१ रोजी मालगाव, ता. मिरज, जि. सांगली येथे मयत झाले आहेत. परंतु कोविडच्या प्रादुर्भावामुळे मृत्यूदाखला वेळेत न मिळाल्याने मुदतीत वारस अभिलेखावर आणता आले नसल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांचे विधीज्ञ आक्षेप नोंदवतात की, वादी यांनी किती दिवसाचा विलंब झाला आहे तो कालावधी नमुद केला नाही. तसेच विलंबाचे दिलेले कारण पुरेसे नाही म्हणून अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती करतात. परंतु मयत झाल्याची तारीख लक्षात घेता, दि.०६.०३.२०२१ रोजी कोविड महामारीची दुसरी लाट अस्तित्वात होती. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार मुदतीच्या कायद्याअंतर्गत येणारे सर्व अर्जांची, दाव्यांची मुदत वाढवून देण्यात आली होती. त्यामुळे सदर मार्गदर्शक तत्वे लक्षात घेता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे.

## आदेश

**०१.** वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** वादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

सही/-
(श्रीमती एम. एस. मनगुळी)
दि.१०.०३.२०२२ दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | II[nd] Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 10/03/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 10/03/2022 |
| Order uploaded on | : | 10/03/2022 |